गोपनीय/अतितात्काळ

क्र. पोमसं/२/१०२०/नि.सू.बि.स.(अभियांत्रिकी)१६-१७/५०/२०१७.
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,**
**शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा,**
**मुंबई- ४०० ००१.**
दिनांक :- /०६/२०१८.
४/७/२०१८

**संदर्भ** :- शासन आदेश, गृहविभाग, क्र. रापोसे-१०१७/प्र. क्र. १०५/पोल १(अ), दि. २९/०६/२०१८ (प्रत संलग्न केली आहे).

**विषय** :- पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) पदावर पदोन्नतीने पदस्थापना...

* * * * * *

शासन आदेश, गृहविभाग, क्र. रापोसे-१०१६/प्र. क्र. २००/पोल-१ अ, दि. ०२/०३/२०१७ अन्वये श्री. हरिराम व्यंकटराव कामडी यांना सरळसेवेच्या कोटयातील पदावर तदर्थ पदोन्नती देण्यात आली होती. पोलीस उपअधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) या पदावर पदोन्नती देण्याकरिता तयार करण्यात आलेल्या, सन २०१६-१७ च्या निवडसूचीमध्ये समाविष्ठ करण्यात आलेल्या पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) संवर्गातील खालील अधिकाऱ्यांना पोलीस उपअधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) या संवर्गात त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी पदोन्नतीच्या कोटयातून तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने पदस्थापनेबाबतचे संदर्भाधिन शासन आदेश याद्वारे कळविण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नांव | पदोन्नतीवरील पदस्थापना |
|---|---|---|
| १. | हरिराम व्यंकटराव कामडी | सहायक पोलीस आयुक्त, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी), नागपूर शहर |

२. पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) पदावर पदोन्नती देण्यासाठी पात्र पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) यांच्या सन २०१६-१७ च्या तदर्थ पदोन्नतीसूचीमध्ये **खालील नमूद अधिकाऱ्यांना** सरळसेवा कोटयातून तदर्थ पदोन्नतीने पदस्थापनेबाबतचे संदर्भाधिन शासन आदेश याद्वारे कळविण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नांव | सध्याच्या नियुक्तीचे ठिकाण | पदोन्नतीवरील पदस्थापना |
|---|---|---|---|
| १. | श्री. राजेश भास्करराव घारोटे | पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी), बृहन्मुंबई | सहायक पोलीस आयुक्त, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी), पुणे |
| २. | श्री. संजय तानाजी हांडे | पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी), सोलापूर शहर | पोलीस उपअधीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी), अमरावती परिक्षेत्र |

३. घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की,

अ. परिच्छेद क्र. २ मधील अधिकाऱ्यांना सरळसेवेच्या पदाकरिता केवळ ११ महिन्यांकरिता अथवा सदर पदाकरिता सरळसेवेद्वारे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडुन अधिकारी उपलब्ध होईपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत असून, त्यानंतर सदर पदोन्नती आपोआप संपुष्टात येईल.

आ. उपरोक्त अधिका-यांपैकी एखाद्याविरूध्द अधिकाऱ्यांस पदोन्नती समितीच्या बैठकीनंतर जर त्यांच्याविरुध्दच्या प्रलंबित / प्रस्तावित विभागीय / संक्षिप्त / प्राथमिक चौकशी / न्यायालयीन कार्यवाहीच्या अनुषंगाने शिक्षा झाल्यास, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दि. १५/१२/२०१७ मधील तरतुदींनुसार पदोन्नती संदर्भात कार्यवाही करावी, व तसे या कार्यालयास कळवावे.

इ. उपरोक्त पदोन्नत्या, मा. सर्वोच्च न्यायालय येथे दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ वर मा. सर्वोच्च

न्यायालयाच्या निर्णयाच्या, तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहुन करण्यात येत आहे.

ई. सदर तदर्थ पदोन्नत्या निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाच्या असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी उपरोक्त अधिकाऱ्यांस नियमितपणा व सेवाज्येष्ठतेचा कोणताही हक्क मिळणार नाही.

उ. पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आलेल्या पदांवर मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण अथवा अन्य मा. न्यायालयाचे आदेश असल्यास तसेच निवडणूक आचारसंहिता असल्यास, ते विचारात घेऊन उक्त अधिकाऱ्यांस पदस्थापनेवरील नियुक्तीच्या ठिकाणी कार्यमुक्त करण्यात यावे.

ऊ. पदोन्नती आदेशाधिन अधिकारी पदोन्नतीवर कार्यमुक्त झाल्याची, तसेच नवीन नियुक्तीच्या ठिकाणी हजर झाल्याची तारीख संबंधीत घटक प्रमुखांनी तातडीने या कार्यालयास कळवावी.

ए पदोन्नतीवरील अधिकारी जर नेमणुकीच्या ठिकाणी तातडीने हजर झाले नाहीत, तर तसे या कार्यालयास कळवावे, आणि त्यांच्याविरुध्द या कार्यालयाच्या क्र. २/५५०७, दि. १६/०९/१९८३, ११/०१/१९८४ व १०/०२/१९९१, तसेच क्र. पोमसं/३/५५०७/६/९७, दि. १३/०२/१९९७ च्या परिपत्रकांतील सूचनांप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी.

ऐ प्रस्तुत आदेशांतील अधिकाऱ्यांच्या सेवापुस्तकांच्या प्रथम पृष्ठांच्या प्रती, व पदभार हस्तांतरण प्रमाणपत्राच्या प्रती कृपया सत्वर या कार्यालयास पाठवाव्यात.

**ओ.** ज्या ठिकाणबाबत कोणत्याही न्यायालयाचे काही विशिष्ट आदेश असतील तथापि त्याठिकाणी सदर आदेशान्वये पदस्थापना झाली असेल तर अशा न्यायालयीन आदेशाची अवमान्यता होणार नाही, याचीही दक्षता घेण्यात यावी.

( संदीप बिश्नोई )
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना )
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
पोलीस आयुक्त, नागपूर शहर / सोलापूर शहर.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र.

प्रत सविनय सादर :-

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, दुसरा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-३२.
( **लक्षवेध :- श्री. अ. अ. खोचरे,** कक्ष अधिकारी)

प्रत सस्नेह :-

महालेखाकार-१ (लेखा व अनुज्ञेयता) / महालेखाकार-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे / सोलापूर / अमरावती.

प्रत:-

पोलीस अधीक्षक, राज्य पोलीस नियत्रंण कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक २ -अ, ३अ, ९, ११, १४-अ, ३६ व ४० (दक्षता विभाग)
पोलीस उप अधीक्षक, संगणक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. प्रस्तुत पदोन्नती आदेश **"पोलीस उप अधीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) २०१६-१७"** या शिर्षाखाली महाराष्ट्र पोलीस दलाच्या संकेत स्थळावर पुढील एक महिन्यासाठी प्रसिध्द करावे.

निवडसूची आणि तदर्थ पदोन्नतीसूची
सन २०१६-१७.
पोलीस उप अधीक्षक/ सहायक पोलीस आयुक्त, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) या संवर्गातील पदावर पदोन्नतीने पदस्थापना....

# महाराष्ट्र शासन
## गृह विभाग
शासन आदेश क्र.रापोसे-१०१७/प्र.क्र.१०५/पोल-१(अ)
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :-२९ जून, २०१८.

संदर्भ:- शासन आदेश क्र: रापोसे-१०१६/प्र.क्र.२००/पोल-१अ, दि. २.३.२०१७

शासन आदेश :-

संदर्भाधीन आदेशाद्वारे श्री. हरिराम व्यंकटराव कामडी यांना सरळसेवेच्या कोटयातील पदावर तदर्थ पदोन्नती देण्यात आली होती. पोलीस उप अधीक्षक/ सहायक पोलीस आयुक्त, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) या पदावर पदोन्नती देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या, सन २०१६-१७ च्या निवडसूचीमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) संवर्गातील संदर्भाधीन आदेशातील खालील अधिकाऱ्यास पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) या संवर्गातील पदावर (वेतनश्रेणी रु.१५,६००-३९,१००+ग्रेड पे ५४००/-) त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी पदोन्नतीच्या कोटयातून तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे :-

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नाव | पदोन्नतीनंतरचे नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | श्री. हरिराम व्यंकटराव कामडी | सहायक पोलीस आयुक्त, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी), नागपूर शहर |

२. पोलीस उप अधीक्षक/ सहायक पोलीस आयुक्त, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) या पदावर पदोन्नती देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या, सन २०१६-१७ च्या तदर्थ पदोन्नतीसूचीमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) संवर्गातील खालील अधिकाऱ्यांस पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) या संवर्गातील पदावर (वेतनश्रेणी रु. १५,६००-३९,१००+ग्रेड पे ५४००/-) त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी सरळसेवेच्या कोटयातून पदस्थापना देण्यात येत आहे :-

18

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नाव | सध्याचे नियुक्तीचे ठिकाण | पदोन्नतीनंतरचे नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री. राजेश भास्करराव घारोटे | पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी), बृहन्मुंबई | सहायक पोलीस आयुक्त, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी), पुणे |
| २ | श्री. संजय तानाजी हांडे | पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी), सोलापूर शहर | पोलीस उप अधीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी), अमरावती परिक्षेत्र |

३. परिच्छेद क्र.२ मधील अधिका-यांना सरळसेवेच्या पदाकरीता केवळ ११ महिन्यांकरीता अथवा सदर पदाकरीता सरळसेवेद्वारे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून अधिकारी उपलब्ध होईपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत असून, त्यानंतर सदर पदोन्नती आपोआप संपुष्टात येईल.

४. उपरोक्त अधिकाऱ्यांस विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीनंतर जर त्यांच्याविरुध्दच्या प्रलंबित/ प्रस्तावित विभागीय / संक्षिप्त / प्राथमिक चौकशी / न्यायालयीन कार्यवाहीच्या अनुषंगाने शिक्षा झाल्यास, सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १५ डिसेंबर, २०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार, पदोन्नती संदर्भात पुढील कार्यवाही करावी.

५. उपरोक्त पदोन्नत्या, मा. सर्वोच्च न्यायालय येथे दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ वर मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या, तसेच, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

६. सदर तदर्थ पदोन्नत्या निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाच्या असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी उपरोक्त अधिकाऱ्यांस नियमितपणा व सेवाज्येष्ठतेचा कोणताही हक्क मिळणार नाही.

७. पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आलेल्या पदांवर मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण अथवा अन्य मा. न्यायालयाचे आदेश असल्यास तसेच निवडणूक आचारसंहिता असल्यास, ते विचारात घेऊन उक्त अधिकाऱ्यांस पदस्थापना देण्यात यावी.

८. उक्त पदोन्नती देण्यात आलेल्या अधिकाऱ्यांस, सध्याच्या पदावरून कार्यमुक्त करून, त्यांना पदोन्नतीच्या पदावर रूजू होण्यासाठी महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी आवश्यक ती कार्यवाही त्वरित करावी.